## गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात पी.एम उषा अंतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन !

जळगाव - गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात पीएम उषा अंतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेचे आज दिनांक 20 नोव्हेंबर रोजी उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ. सुरेखा पालवे. तसेच विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्टडीज चे चेअरमन डॉ. पराग नारखेडे, गोदावरी अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ विजयकुमार पाटील, संचालक डॉ. प्रशांत वारके, प्रिन्सिपल डॉ. नीलिमा वारके आदी मान्यवर उपस्थित होते त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि सरस्वती वंदनीने झाली कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सुरेखा पालवे (मेंबर ऑफ मॅनेजमेंट कौन्सिल) यांनी केले याप्रसंगी बोलताना डॉ. सुरेखा पालवे यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये सातत्याने प्रगती साधण्याची गरज अधोरेखित केली त्यांनी शिक्षकांना नवीन कौशल्य सोबतच भविष्याची तयारी करण्याचे मार्गदर्शन दिले व डॉ. मनमोहन सिंग, रघुराम राजन आर.बी.आय गव्हर्नर हे देखील सुरुवातीच्या काळात प्राध्यापक होते असे उदाहरण शिक्षकांसमोर ठेवले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्टडीज इन मॅनेजमेंट चे चेअरमन डॉ. पराग नारखेडे यांनी एन.ए.पी पॅटर्न, क्रेडिट दोन-चार, टिचिंग, NAAC क्रायटेरिया याबद्दल सखोल विश्लेषण केले विद्यार्थ्यांना लागणाऱ्या नोट्स बदलती शिक्षण पद्धती कौशल्यापासून ते संस्थानात परिणामांपर्यंतच्या ज्ञानासाठीचे शैक्षणिक नेतृत्व यावर देखील त्यांनी प्रकाश टाकला, उच्चशिक्षित ज्ञान व्यवस्थापन बौद्धिक भांडवल मिळवणे आणि टिकवणे यावर त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालय आणि प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान, न्यू दिल्ली यांच्या अंतर्गत शिक्षकांची क्षमता बांधणी हा दोन दिवसीय कार्यक्रम घेण्यात येत आहे.

या कार्यक्रमात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून विविध महाविद्यालयांचे 30 प्राध्यापक सहभागी झालेले असून त्यांना विद्यापीठातर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आफ्रीन खान यांनी केले.